Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 12pp.1-4 प्रा. डॉ. कैलास सोनवणे. ISSN:-2230-7850

Research Papers

# महिला सबलीकरणाचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर:

प्रा. डॉ. कैलास सोनवणे.
राज्यशास्त्र विभाग
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय
राजगुरूनगर,ता.खेड,जि. पुणे

## प्रस्तावना :—

भारताच्या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आदाराने घेतले जाते. सर्व देशाचे हित आणि उन्नती व्हावी अशी त्यांची धारणा होती. त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात फार मौलिक आणि अनन्यसाधारण कामगिरी बजावली. भारतातील महिला वर्गाच्या सक्षमीकरणास आणि सबलीकरणासाठी त्यांनी कृतिशील भूमिका घेतली होती.

स्वातं०य, समता, बंधुता ही आपल्या राज्यघटनेची आधारत्रयी आहे. डॉ. आंबेडकर यांचे महिला वर्गाच्या समस्यांचे आकलन अभ्यासपूर्ण होते. व्यापक, सखोल माहितीची, ज्ञानाची, चिंतनाची त्याला जोड होती.

27 डिसेंबर, 1927 रोजी महाडच्या सत्याग्रहाच्या चळवळीत जवळजवळ पाच हजार स्त्रियांची स्वतंत्र अशी सभा आयोजित केली होती. त्या काळात स्त्री फारशी घराबाहेर पडत नव्हती त्या काळात महाडसारख्या गावी पाच हजार स्त्रियांची उपस्थिती असणे ही साधीसुधी गोश्ट नव्हती. डॉ. आंबेडकर यांच्या स्त्री सबलीकरणाचे, स्त्री सक्षमीकरणाचे ते एक प्रसादचिन्ह होते, असे मानले पाहीजे. डॉ. आंबेडकर यांना भारताच्या विकासासाठी, प्रगतीसाठी लोकसंख्या नियंत्रण अत्यावश्यक आहे, असे तीव्रतेने वाटत होते. डॉ. आंबेडकर यांना महिलांच्या आरोग्याची व स्वास्थ्याची आवश्यकता वाटत होती. महिलांचे आरोग्य व कुटुंबाचे योग्य नियोजन महिलांशीच संबंधित आहे अशी स्पश्ट भूमिका त्यांनी घेतलेली होती.

हिंदू कोड बिलात त्यांनी यासाठीच्या कायद्यांचा पाठपुरावा केला होता. हिंदू कोड बिलात स्त्रियांना समान हक्क आणि इस्टेटीत वाटा मिळायलाच हवा अशी त्यांची आग्रही भूमिका होती.

डॉ. आंबेडकर हे तत्वासाठी लढणारे योध्दे होते. समाजातील अन्याय दूर करण्यासाठी आणि दलितांचा उध्दार करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. डॅ. आंबेडकरांनी भारताच्या राज्यघटनेत स्त्री—पुरूश समतेची जाहीर नोंद करून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, मालकी हक्क,

सक्तीचे व मोफत शिक्षण, सकस आहार, शरीरस्वाथ्य आणि जीवनमान उंचावणे

अशा अनेक कायद्यात स्त्रियांच्या समानतेचा उल्लेख केला आहे. स्त्रियांना अनेक कायद्यांनी आणि कलमांनीही समतेची हमी दिली आहे.

प्रज्ञावंत डॉ. आंबेडकर हे समाजद्रश्टे होते. तत्कालीन महिलांच्या समस्येची त्यांची जाण वस्तुनिश्ठ आणि विलक्षण होती. स्त्री आत्मनिर्भर झाली पाहिजे कारण समाजनिर्मितीचा ती मूलाधार आहे, असे त्यांचे विचारसूत्र होते. स्त्री सबलीकरणाचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. हिंदू समाजातील निरनिराळया जाती आणि पुरूश व स्त्रिया यांच्या प्रत्येक जीवनावश्यक क्षेत्रात कमालीची विशमता होती. हिंदू कुटुंब पध्दतीच्या स्थावर, जंगम मालमत्तेच्या वारसा हक्कातही न्यायपूर्ण व्यवस्था नव्हती. स्त्रियांच्या बाबतीत वारसाहक्क व विवाह यासंबंधी अनेक अन्यायकारक कलमे होती. त्यात योग्य ती दुरूस्ती व्हावी असे समाजसुधारकांना वाटत होते.

सर्व हिंदू कोड कायद्यांचे संहितीकरण करून सर्व हिंदूंना एकच कायदा करावा व त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्यात यावेत या चळवळीतून आलेल्या मागणीसाठी सरकारने 1941 साली ‘हिंदू कोड कमीटी’ नेमली होती. डॉ. आंबेडकर कायदेमंत्री असल्यामुळे हिंदू कोड बिलाला कायदेशीर भाशेत मांडण्याचे काम

*Indian Streams Reserach Journal*
Vol.1,Issue.XII/*Jan;* 2012

डॉ. आंबेडकरांकडे होते. प्रकृती चांगली नसतानाही त्यांनी यावर अतिशय काळजीपूर्वक आणि सचोटीने काम केले. हिंदू कायदा सर्वांग सुंदर व्हावा म्हणून प्रत्येक कलम ते नीट तपासून पुन्हा पुन्हा लिहून काढीत असत. प्रचंड परिश्रम करून त्यांनी हिंदू कोड बिल तयार केले होते.

जीर्णमतवादी आणि सनातनी हिंदूंनी या बिलाला कडाडून विरोध केला. बिलात घटस्फोट आणि एकपत्नीव्रत याला विरोध असल्यास त्यावर चर्चा करण्याची तयारी डॉ. आंबेडकरांनी दाखवली होती. राज्यघटना डॉ. आंबेडकरांनी तयार केली होती. समानतेच्या दृश्टीने हिंदू कोडात सुधारणा केल्याशिवाय त्या राज्यघटनेला काही अर्थ प्राप्त होऊ शकत नाही, असे त्यांचे मत होते ब्रिटिशांच्या काळापासून काही समाजसुधारणेचे कायदे पास झाले. परंतु जाती–जातीतील आणि स्त्री–पुरूशांच्या हक्कासंबंधी असलेली असमानता निपटून काढण्याची कोणाची ताकद नव्हती. ते आव्हान स्वीकारून पार्लमेंटमध्ये बिल मांडण्याचे धाडस डॉ. आंबेडकरांनी केले. हिंदू कोड  बिलाने हिंदू स्त्रियांचा फायदा होणार होता. भारतातील सर्व धर्म, जाती आणि

समाज यांचे कायदे स्त्रियांना न्याय देणारे नाहीत, ते तसे व्हावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केले. परंतु स्वतंत्र भारतात देखील विवाह व त्या अनुशंगाने येणारे प्रश्न 'खासगी' आहेत, असेच राजकारण्यांचे मत होते. धार्मिक दंगे होतील. अल्पसंख्याकांची मने दुखावतील अशा विचाराने आणि खरे तर मताच्या पेटीवर डोळा ठेवून हयास जोरदार विरोध करण्यात आला. हे बिल जसेच्या तरे पास होऊ शकले नाही. दोन वर्श रात्रंदिवस मेहनत करून तयार केलेल्या बिलाचा असा शेवट झाल्याचे बघून बाबासाहेबांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. परंतु हिंदु कोड बिल पास होईपर्यंत मी माझा लढा चालूच ठेवीन, असे त्यांनी पं. नेहरूंना पत्र पाठवून कळवले.

अन्यायाविरूध्द आवाज उठवून सर्वांना समान वागणूक मिळाली पाहिजे म्हणून सतत प्रयत्न करणारे दलितांचे आणि स्त्रियांचे कैवारी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले जाते ते योग्यच आहे.

भारतातील स्त्रीमुक्तीच्या कामगिरीत डॉ. आंबेडकर यांचे योगदान मोलाचे आणि क्रांतिकारक आहे. वंचित, शोशित, पीडित महिला वर्गाच्या सबलीकरणासाठी, सक्षमीकरणासाठी त्यांची कामगिरी ही आधारभूत आणि साहाय्यक अशीच आहे.

हिंदू कोड बिलः

हिंदू समाजाला लागू पडणारा हिंदू कायदा हा ब्रिटिश अमदानीत तयार करण्यात आला. त्याचा पाया वेद, श्रुती आणि स्मृती या हिंदूंच्या धर्मशास्त्रांनी सांगितलेले आचार विचार विशयक नियम आणि हिंदूच्या आचारविचारांतून निर्माण झालेल्या व समाजात रूढ झालेल्या रूढी व परंपरा यांचा आहे. हिंदू धर्म हा ईश्वरी आज्ञेवर उभारलेला असल्यामुळे तो प्रत्येकाने पाळला तर त्याला सद्गती (मोक्ष) मिळते आणि न पाळला तर दुर्गती (नरक) मिळते, अश परंपरेने श्रध्दा रूढ झाली. या सामाजिक श्रद्धेमुळे पुरोहितवर्ग व राज्यकर्ते क्षत्रिय यांचे समाजात प्राबल्य वाढले. त्यात पुरोहितवर्गाने आपले अनयिंत्रित सामर्थ्य व श्रेशठत्व प्रस्थापित करण्यासाठी समाजात जाती निर्माण करून त्यांचे जीवन एका मर्यादित चाकोरीत जखडून टाकणारे नियम श्रुती व स्मृती या ग्रंथांत घालून अनुल्लंघनीय स्वरूपाच्या अनेक जाती निर्माण केल्या.

स्त्री आणि पुरूश यांच्यातील व्यवहारी संबंधाबददल वेळोवेळी कडक नियम करण्यात आले. त्यामुळे हिंदू समाजातील निरनिराळया जाती आणि पुरूश व स्त्रिया यांच्यात प्रत्येक जीवनावश्यक क्षेत्रात कमालीची विशमता निर्माण झाली. हिंदू कुटंबपध्दतीच्या स्थावर–जंगम मालमत्तेच्या वारसाहक्कातही न्यायपूर्ण व्यवस्था नव्हती. स्त्रियांच्या बाबतीत वारसाहक्क व विवाह यांसंबंधी अनेक अन्यायमूलक कायद्यांची कलमे आहेत. त्यात योग्य ती दुरूस्ती व्हावी असे समाजसुधारक व स्त्रियांच्या संस्था यांना वाटत होते. त्याप्रमाणे चळवळीही करण्यात आल्या. या कलमांना दुरूस्त्या सुचविणारी अनेक बिले मध्यवर्ती कायदेमंडळात आणली गेली.

1937 साली सर्वश्री अखिचंद्र दत्त, ए.एन. चट्टोपाध्याय, कैलास बिहारी, न. वि. गाडगीळ, के. संतानम आणि डॉ. व्ही.जी. देशमुख यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात प्रयत्न केले. हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधीचा कायदा व त्यात दुरूस्त्या सुचविणारी विधेयके (बिल्स) यांनी मांडली. ही विधेयके मंजूर झाली नाहीत. हिंदू स्त्रियांना एकत्र कुटूंबापासून स्वतंत्र राहण्याचा हक्क असावा व त्यांना त्या कुटुंबाच्या एकत्र स्थावर–जंगम मालमत्तेतून पोटगी मिळावी, असे विधेयक डॉ. देशमुख यांनी आणले होते, पण ते मंजूर झाले नाही.

1937 सालचा हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेसंबंधीच्या हक्कांचा कायदा मंजूर करण्यात आला. पण या जुजबी सुधारणेमुळे कायदेपंडित, समाजसुधारक आणि सुशिक्षित स्त्रिया यांचे समाधान झाले नाही. हिंदू कायद्यात सर्व प्रकारची इश्ट सुधारणा झाली पाहिजे अशी चळवळ त्यांनी सुरू केली व सरकारकडे या बाबतीत मागणी केली. या सर्व सूचनांचा विचार करून सरकारने 1941 साली 'दि हिंदू कोड कमिटी' नेमली. सर्व हिंदू कोड कायद्यांचे संहितीकण करून सर्व हिंदूंना एकच कायदा करावा व त्यात हिंदू स्त्रियांना समान हक्क देण्यात यावेत हे या समितीचे प्रमुख काम होते. वारसाहक्क व विवाह या विशयांसंबंधी विस्तृत प्रश्नपत्रिका तयार करून कमिटीने सुधारकांची, जीर्णमतवाद्यांची व स्त्री संस्थांची मते अजमावण्यासाठी पाठविल्या. त्यांच्याकडून जे अभिप्राय व ज्या सूचना आल्या त्यांचा साकल्याने विचार करून समितीने कायद्याचा एक मसुदा तयार केला. त्याची दोन विधेयके मार्च

1943 मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळात मांडण्यात आली. ती वारसाहक्क व विवाह यासंबंधी होती. त्या दोन्ही विधेयकांवर सनातनी हिंदूंनी, सरकार असले कायदे करून सनातन हिंदू धर्माचा निःपात करीत आहे असे म्हणत कडाडून हल्ला केला.

सुधारकांनी सदर विधेयकात काही बदल व दुरूस्त्या सुचविल्या. त्याचा विचारविनिमय करण्यासाठी कायदेमंडळाने ती विधेयके जॉईंट सिलेक्ट कमिटीकडे सोपविली. कमिटीने दुरूस्त्या करून परत ती कायदेमंडळाकडे पाठविली, पण ती मंजूर झाली नाहीत. 1944 साली सरकारने हिंदू कायद्याचे संहितीकरण करण्याचे काम हिंदू लॉ कमिटीकडे दिले. त्या कमिटीचे अध्यक्ष सर बेनेगल नरसिंहराव होते. सदर कमिटीने हिंदू कायद्याचा मसूदा तयार केला. तोच हिंदू कोड म्हणून प्रसिध्द झाला. ते विधेयक पूर्वी जॉईंट सिलेक्ट कमिटीने तयार केलेल्या नमुन्यावरच तयार केले. सदर विधेयकाविरूध्द सनातन्यांनी पुन्हा चळवळ सुरू केली.

डॉ. आंबेडकर कायदेमंत्री असल्यामुळे हिंदू कोड बिलाला कायदेशीर भाशेची लेणी लेवविण्याचे काम त्यांच्याकडे होते. त्यांनी प्रकृती चांगली नसतानाही यावर अतिशय काळजीपूर्वक आणि सचोटीने काम केले. हिंदू कायदा सर्वांगसूंदर व्हावा म्हणून ते प्रत्येक कलम नीट तपासून पुनःपुन्हा लिहून काढीत असत. प्रचंड परिश्रम करून त्यांनी हे बिल तयार केले.

बिल लोकसभेत येणार हे समजल्यावर जीर्णमतवादी सनातनी हिंदूंनी बिलाविरूध्द जाहीर चळवळ सुरू केली. सदर विरोधकांना डॉ. आंबेडकर जाहीर उत्तरे देत होतेच.

पं. जवाहरलाल नेहरू यांनीही काही झाले तरी हिंदू कोड बिल आम्ही मंजूर करणारच अशी ग्वाही दिली.

` बिल मंजूर होईल म्हणून जीर्णमतवादी विरोधक जास्तच चिडले. हिंदू कोड बिल आमच्या धर्मावर घाला घालीत आहे असा त्यांचा मुद्दा होता. पण आतली खरी गोश्ट म्हणजे आंबेडकर हे अस्पृश्य म्हणजे अवर्ण; त्यांच्या हातून स्मृतिशास्त्रात फेरफार घडवून आणणे म्हणजे भ्रश्टाचार आहे असे त्यांना वाटत असावे. त्यामुळे त्यांचा कडाडून विरोध असावा. जीर्णमतवाद्यांचा विरोध वाढत होता

तरी बिल मंजूर करून घेण्यास सरकार बांधील आहे म्हणून पं. नेहरू निवडणुकीच्या आत बिल

मंजूर करून घेण्याच्या मागे होते. बिलात घटस्फोट आणि एकपत्नीव्रत इ. कलमामुळे मतभिन्नता असेल तर त्यावर चर्चा करून विरोधकांच्या मतांना मान देण्याची तयारी डॉ. आंबेडकरांनी दाखविली. कसेही करून बिल मंजूर व्हावे हाच त्यांचा हेतू होता.

हिंदू कोड बिलाचे कलम 2 यात निरनिराळया विशयांची क्षेत्रव्याप्ती याबद्दल तरतूद केलेली होती. हे कलम लोकसभेत चर्चेला आल्यावर मुसलमान, खिस्ती, जैन, शीख यांनी हे कलम आपल्या लोकांना लागू करू नये म्हणून कडाडून विरोध दर्शविली. हिंदूच्या तर्फे श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी विरोध केला.

लोकसभेत 18 सप्टेंबर 1951 रोजी यावर खडाजंगी चर्चा झाली. त्यात न. वि. गाडगीळ यांनी सांगितले की, सर्व बिलातील 80 टक्के भाग निरनिराळ्या हिंदूधर्मशास्त्रातील आधारावर आणि हिंदू कायद्यावर उभारून डॉ. आंबेडकरांनी हे प्रचंड संहितीकरण केले आहे. बाकीचा 20 टक्के भाग नवीन सुधारणा घडवून आणणारा आहे. 80 टक्के भागाला विरोध करण्याचे काही कारण नाही कारण ते कायदे अस्तित्वात आहेत. 20 टक्के भाग सुधारणा घडवून आणणारा आहे. त्या सुधारणा भारतीय घटनेतील समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या तत्वांना धरून आहेत तेव्हा त्या सुधारणांना विरोध करणे म्हणजे जुन्या परंपरेला चिकटून राहण्यासारखेच आहे. हिंदूचे धार्मिक सामाजिक आचारविचार व चालीरीती यांना आधुनिकतेचे रूप देणे ही बिलात प्रमुख बाब होती.

अनेक सभासदांची कलम दोनवर सात दिवस चर्चा झाली आणि ते मंजूर झाले. घटस्फोटाच्या कलमाबद्दल कॉंग्रेसच्या सभासदांत तीव्र असंतोश पसरला. त्यांच्या मते पुर्वपरंपरेने चालत आलेली जी घटस्फोटाची चाल आहे तिला बिलात स्थान नाही. खिश्चन लोकांच्या मते हिंदू आणि खिस्त यांचे विवाह झाले तर घटस्फोटाच्या तरतुदींमुळे घोटाळे होऊ शकतील. ते कसे टाळावेत याबद्दल बिलात योजना केली पाहिजे. सर्व विरोधकांचे म्हणणे ऐकल्यावर आंबेडकरांनी बिलात दुरूस्ती करण्याचे मान्य केले. बिलाचा दुसरा भाग मूळ स्वरूपात या अधिवेशनात मंजूर होणे शक्य दिसत नव्हते म्हणून विवाह आणि घटस्फोट कायदा यात योग्य त्या दुरूस्त्या करण्याचे आंबेडकरांनी ठरविले.

हिंदू कोड बिल हे धर्माचा, शास्त्राचा अवमान करणारे आहे असे वाटत असल्यामुळे हिंदूंचा त्याला विरोध होता. पं. नेहरू आणि डॉ. आंबेडकर यांना हिंदू धर्मशास्त्राचे ज्ञान नाही, त्यांनी तयार केलेले बिल टाकून द्यावे असे म्हणण्याइतका कडवा विरोध या बिलाला करण्यात आला.

हिंदू कोड बिलाला विरोध करणाऱ्यांचे तीन वर्ग होते. एक सनातनी वर्ग, धर्म, नैतिक विचार, धार्मिक ग्रंथ ईश्वरप्रणीत असल्यामुळे त्यात ढवळाढवळ करण्याचा कोणालाही अधिकार नाही, असे त्यांचे मत होते. म्हणून कोणत्याही सामाजिक व धार्मिक सुधारणेला त्यांचा विरोध होता. दुसरा वर्ग राजकीय पुढाऱ्यांचा, मतदारांना खुश ठेवण्यासाठी त्यांना काही निर्णय मताच्या पेटीवर डोळा ठेवून घ्यावे लागतात. तिसरा वर्ग सवर्ण हिंदूंतील वर्णश्रेश्ठत्वाने पछाडलेल्या लोकांचा, हिंदू धर्मशास्त्रांचे संहितीकरण एका अस्पृश्य पंडिताने करणे ही त्यांच्या दृष्टीने नामुश्कीची गोश्ट होती. वेगवेगळया कारणांनी या बिलाला विरोध झाला. 'बिल नामंजुर झाले तर मंत्रिमंडळ राजीनामा देईल' अशा घोशणा देणारे नेहरू मंत्रिमंडळ विरोधाला घाबरले. 1952 च्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्ष निवडून येण्यासाठी मतदारांतील जीर्णमतवाद्यांपुढे मंत्रिमंडळाला मान तुकवावी लागली. दोन वर्श रात्रंदिवस मेहनत करून तयार केलेल्या बिलाचा असा शेवट झाल्याचे बघून आंबेडकरांना मनस्वी वाईट वाटले. आंबेडकरांनी संहिता केलेल्या हिंदू कोड बिलाला कॉंग्रेस पक्षीयांचा विरोध व त्यांना अनुसरून पं. नेहरूंचे तत्वाला तिलांजली देण्याचे कचखाऊ धोरण या हिंदू कोड बिलाला मिळालेल्या वागणुकीमुळे डॉ. आंबेडकरांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. राज्यघटना जरी बाबासाहेबांनी तयार केली असली तरी समानतेच्या दृश्टीने हिंदू कोडात सुधारणा केल्याशिवाय त्या राज्यघटनेला काही महत्व, अर्थ प्राप्त होऊ शकत नव्हता.

ब्रिटिशांच्या काळापासूनच त्यात सुधारणा व्हावी म्हणून वेळोवेळी काही समाजसुधारणेचे कायदे पास झाले. परंतु जाती–जातीतील आणि स्त्री – पुरूशांच्या हक्कासंबंधी असलेली असमानता निपटून टाकण्याची कोणाची ताकद नव्हती. ते आव्हान स्वीकारून पार्लमेंटमध्ये बिल मांडण्याचे धाडस डॉ. आंबेडकरांनी केले.

परंतु (1) हिंदू धर्माने निशिध्द ठरविलेल्या अस्पृश्याकडून, (2) पुढच्या निवडणुकांवर लक्ष ठेवून व (3) प्रस्थापितांच्या इभ्रतीला धक्का पोचणार होता या कारणास्तव हे बिल पास झाले नाही.

हे बिल पास न करण्यात भारताची उच्च –नीचतेची ऐतिहासिक परंपरा टिकविण्याचाच अट्टहास होता.

हिंदू कोड बिलाने हिंदू स्त्रियांचा फायदा होणार होता. पण पं. नेहरु आणि कॉंग्रेस पक्ष यांना हिंदू कोड बिल मंजुर करण्यात दगलबाजी केली. नेहरु बिलाच्या बाजूने असोत वा विरोधात असोत, हे बिल संमत करुन घेतल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे आंबेडकर ठासुन म्हणत होते.

नशीब आणी लोकसभेचे नियम आपल्याविरुध्द गेल्यामुळे हिंदू कोड बिलासाठी आपण काही करु शकत नाही. पण प्रगतीसाठी हिंदू कोड बिल संमत झाले पाहिजे याबददल माझी खात्री झाली आहे. त्यामुळे हिंदू कोड बिलाचा लढा मी चालू ठेवीन, असे डॉ. आंबेडकरांना पाठवलेल्या पत्रात पं.नेहरु यांनी आश्वासन दिले होते.

ब्रिटिश भारतातून गेल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांना हया देशात जसे इतर कायदे सर्वांना समान आहेत तसेच विवाहविशयक कायदे पण सर्वांना असावेत हया हेतूने तसा मसुदा तयार केला. भारतातील सर्व, जाती आणी समाज यांचे कायदे स्त्रियांना न्याय देणारे नाहीत. ते तसे व्हावेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केले. परंतु स्वतंत्र भारतात देखील विवाह व त्या अनुशंगाने येणारे प्रश्न 'खाजगी' आहेत असेच राजकारण्यांचे मत होते.

धार्मिक दंगे होतील, अल्पसंख्याकांची मने दुखावतील अशा विचाराने आणि खरे मताच्या पेटीवर डोळा ठेवून हयास जोरदार विरोध करण्यात आला. शेवटी डॉ. आंबेडकरांनी निदान बहुसंख्य असणाऱ्या हिंदूचा कायदा बदलावा म्हणून जोर लावला आणी त्यावेळेच्या स्त्री संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला त्यामुळे हिदू कायदयात काही सुधारणा करण्यात करण्यात आल्या व आजचा हिंदू कोड बिल 1977 चा कायदा लागू झाला.

1952 नंतर सरकारतर्फे पूर्वीच्या हिंदू कोड मसुदयातून (1) दि हिंदू मॅरेज

ॲक्ट 1177,(2) दि हिंदू सक्सेशन ॲक्ट,जून 1956,(3) दि हिंदू मायनॉरिटी ॲण्ड गार्डियनशिप ॲक्ट,ऑगस्ट 1956आणि (4) दि हिंदू अडॉप्शन ॲण्ड मेंन्टेनन्स ॲक्ट, डिसेंबर 1956 हे कायदे करण्यात आले. ते डॉ आंबेडकरांनी कायदेमंत्री म्हणून राजीनामा दिल्यानंतर झालेले कायदे आहेत.

हिंदू कोड बिलाचे निरनिराळे भाग करुन व त्यात फेरफार करुन नवीन चार कायदे मंजूर करण्यात आले.

स्त्रियांच्या हितसंरक्षणाच्या हेतूने भारतात वीस कायदे करण्यात आले.ते असे–

1) सतीप्रतिबंधतक कायदा ,1826
2) हिंदू विधवापुनर्विवाहोत्तेजक कायदा,1856
3) धर्मांतराचा पूर्वीचा कायदा रदद करणारा कायदा,1866
4) भारतीय तलाक कायदा,1872
5) खिस्ती विवाह कायदा,1872
6) विवाहित नारी संपत्ती संरक्षण कायदा,1974
7) लीगल प्रॅक्टिशनर (वुइमेन्स) ॲक्ट,1923

Indian Streams Reserach Journal
Vol.1,Issue.XII/Jan; 2012

8) बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) कायदा,1926
9) हिंदू उत्तराधिकार अधिनियम (संशोधित) कायदा,1926
10) पारसी विवाह आणि तलाक कायदा, 1936
11) हिंदू नारी संपत्ती अधिकार कायदा,1936
12) प्रसूती अवस्थेत मिळावयाचे हक्क– यासंबधीचा कायदा,1943
13) हिंदू विजोड विवाह प्रतिबंधक कायदा,1946
14) हिंदू विवाह वैधता कायदा,1946
15) विशेश विवाह कायदा,1955
16) हिंदू विवाह कायदा,1955
17) हिंदू उत्तराधिकार कायदा,1956
18) हिंदू दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा, 1956
19) हिंदू दत्तकग्रहण कायदा,1958
20) वेश्यावृत्ती उन्मूलन कायदा, 1958

याप्रमाणे डॉ आंबेडकर खऱ्या अर्थाने महीलांच्या सबलीकरणाचे व सक्षमीकरणाचे अग्रणी समाज सुधारक म्हणून पुढे आलेले आपणास दिसतात.

थोडक्यातमहिला सबलीकरण म्हणजे असा समाज निर्माण करणे की ज्यामध्ये स्त्रियांना आपल्याशी निगडीत असलेल्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या सुप्त क्षमता प्रत्यक्ष वापरता येतील. या संकल्पनेच्याच प्रत्यक्ष निर्मितीसाठी महाराश्ट्रातील अनेक समाजसुधारकांनी आपली मोलाची भर घातली असे आपणास निश्चितपणे मांडता येते.

***संदर्भग्रंथः***

1. डॉ. विद्युत भागवत, 'सक्षमीकरण' संकल्पना आणि व्यवहार, महिला सबलीकरण विशेशांक पुणे विद्यापीठ वार्ता कार्यकारी संपादक डॉ. धनंजय लोखंडे वर्श एप्रिल 2002 मार्च 2003.
2. डॉ. विलास आढाव, महिला सबलीकरण पुणे विद्यापीठ 2009
3. डॉ. य. दी. फडके, महात्मा फुले समग्र वाड्मय, महाराश्ट्र राज्य साहीत्य आणि संस्कृती मंडळ मुंबई 1992.
4. डॉ. विद्युत भागवत, स्त्री प्रश्नांची वाटचाल, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004.
5. डॉ. य. दी. फडके, आंबेडकरी चळवळ, श्री विद्या प्रकाशन, पुणे 1990.
6. पुश्पा रोडे, ज. शं. आपटे, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008